# मुंबईच्या वांद्रा कुर्ला परिसरात फक्त श्रीमंतांसाठी घरे

# पैशांची ढेकर देणाऱ्यांचे पाय चाटताना लाज वाटत नाही?

संपादकीय

जयश्री खाडिलकर-पांडे

मुंबईतील म्हाडाची जागा ही सरकारी जागा आहे. त्यांची खाजगी मालमत्ता नाही. गरीब आणि मध्यम वर्गाकरिता घरे बांधण्यासाठी आणि ती माफक दरात देण्यासाठी म्हाडाची स्थापना झाली. त्यासाठी सरकारी जमिनी म्हाडाच्या हवाली केल्या. पण म्हाडा आता गरीब आणि मध्यमवर्गाला विसरली आहे. त्यांना आता श्रीमंतांसाठी परवडणारी घरे बांधायची आहेत. म्हणजे पैशाचा ढेकर आलेल्यांना ८ आणि ९ कोटींची घरे परवडत नाही म्हणून फुकटची सरकारी जमीन घेऊन त्यावर त्यांच्यासाठी स्वस्तात ५ आणि ६ कोटींची घरे म्हाडा बांधणार आहे. पैसेवाल्यांचे अशा तऱ्हेने पाय चाटताना म्हाडाला लाज वाटत नाही का?

म्हाडा म्हणजे दुकान झाले आहे. या दुकानात गरिबांना रेशन मिळत नाही. भ्रष्टाचाराने पूर्ण पोखरलेले हे दुकान आहे. म्हाडाच्या एकेका अधिकाऱ्यांच्या घरावर छापे मारले तर जो पैसा निघेल त्यात गरिबांच्या सात पिढ्या जगू शकतील. त्यातच ज्या नेत्यांना सरकारमध्ये पदे न मिळाल्याने चरता येत नाही त्या नेत्यांची क्षुधा शांती करायला त्यांना म्हाडाच्या डोक्यावर आणून बसवतात. आता भाजपाचे मधू चव्हाण आणि शिवसेनेचे उदय सामंत तिथे रमले आहेत. आधी काँग्रेस आणि राष्ट्रवादीवाले होते. या नेत्यांना मुंबईतील गरीब दिसत नाहीत? गरिबांनी आणि मध्यमवर्गानी पनवेलहून लोकलने लटकत येऊन म्हाडाने श्रीमंतांसाठी बांधलेल्या घरात भांडी घासायची? शिवसेना स्थापन झाली तेव्हा वाघ आरोळ्या ठोकत होता की, हौसिंग बोर्डातील ८० टक्के जागा मराठी भाषिकांसाठी राखीव ठेवू. या आरोळ्या ठोकता तर मग मराठी माणसांना परवडतील अशी घरे बांधली का जात नाहीत? तुमच्या आरोळ्या हवेत विरल्या की पैशाच्या थप्प्यांखाली दबल्या? नसा ताणून तुमचा शिवसैनिक म्हणतो, मुंबई आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची आणि तुम्ही त्याच कार्यकर्त्यांना लाथा मारून मुंबईबाहेर घालवता? म्हाडाची गेल्यावेळी लॉटरी निघाली तेव्हा अल्प आणि अत्यल्प गटासाठी हाताच्या बोटांवर मोजता येतील इतकी कमी घरे होती. तेव्हा 'अल्प' श्रेणीतील गरिबाला राखीव घरांची किंमत १५ लाख बघून त्याला तिथेच घेरी आली. 'नवाकाळ'ने खणखणीत अग्रलेख लिहिल्यावर भाजपाचे मधू चव्हाण यांनी म्हाडाच्या कार्यालयात बसून स्वस्त घरे बांधा असा आदेश दिला. त्यांना भरपूर पब्लिसिटी मिळाली. पण त्यांचा आदेश भुरटा होता आणि त्यांचे अश्रूही खोटे होते.

कुत्र्याची शेपटी वळत नाही असे म्हणतात तेच खरे आहे. कारण आता मुंबईच्या 'श्रीमंत' वांद्रा कुर्ला संकुलातील भारतनगरचे संक्रमण शिबीर हटवून म्हाडाने तिथे उंच उंच टॉवर बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या टॉवरमध्ये फक्त श्रीमंतच राहणार आहेत. कारण इथला प्रत्येक फ्लॅट हा १४०० चौरस फुटांचा असणार आहे. गरिब आणि मध्यमवर्गीयांसाठी इथे फ्लॅट बांधलाच जाणार नाही. कारण म्हणे या परिसरातील दर गरिबांना परवडणार नाही. इथे श्रीमंतांसाठी फ्लॅट बांधून ते विकणार आणि त्या पैशातून मुंबईच्या बाहेर कोणत्या तरी अडगळीच्या जागी गरिबांसाठी घरे बांधायची अशी म्हाडाची योजना आहे. म्हाडाची ही




भयंकर लबाडी आहे. म्हाडाला जमीन फुकट मिळते. त्यावर फक्त बांधकाम खर्च घेऊन गरिबासाठी ४०० चौरस फुटाची घरे बांधून आणि त्याची रक्कम ३० वर्षांच्या हप्त्यात घेण्याची सुविधा दिली तर ती घरे गरिबाला परवडणारी होतील. म्हाडाने स्वस्तात घरे देण्यास सुरुवात केली तर या परिसरातील सर्व घरांच्या किंमती धडाधड कोसळतील.

पण म्हाडा हे करीत नाही. कारण वांद्रा कुर्ला संकुल हे श्रीमंतांसाठी आहे हे सरकारने, पालिकेने आणि म्हाडाने ठरवून टाकले आहे. पूर्वी मुस्लिम बहुल, ख्रिश्चन बहुल, पार्शी बहुल असे भाग मुंबईत बनले होते. आता पैशापुढे सब नंगे आहेत. आता फक्त श्रीमंत आणि गरीब असेच तट पाडले जात आहेत. वांद्रा कुर्ला संकुलात गरीब राहणार याची म्हाडालाच लाज वाटते आहे. म्हणून म्हाडा फुकटच्या जमिनीवर १४०० चौरस फुटाची घरे बांधणार आहे. १४०० चौरस फूट म्हणजे काय झाले? आज गरिबाची स्वप्नांची मजल ४०० फुटाच्या घरापर्यंत जाते. हे स्वप्नही त्याला अशक्य वाटते. ४०० फुटाच्या घरात राहायचे आणि शेजारी हजार फुटाचे एखादे मोकळे मैदान दिसले तर त्यावर क्रिकेट खेळायचे एवढीच गरिबाची आणि मध्यम वर्गाची इच्छा राहिली आहे. पण म्हाडा श्रीमंतांसाठी लोळायला १४०० फुटांची घरे बांधणार आणि पालिका फुकटच्या मैदानांवर त्यांच्यासाठी जिमखाने उभारणार हा प्रकार सुरू आहे.

ही मानसिकता उखडून फेकली पाहिजे. म्हाडाची दुकानदारी बंद करायला हवी. सरकारी जमिनींवर फक्त मराठी भाषिक गरीब आणि मध्यम वर्गीयांसाठीच घरे बांधली गेली पाहिजेत. म्हाडाविरोधात आज आवाज उठविला नाही तर मुंबईच्या या मायानगरीत गरीब फक्त नोकरीपुरता येत राहील.